www.nyayranbhumi.com मराठी, हिंदी व इंग्रजी साप्ताहिक 9029909904 nyayranbhumi@gmail.com RNI No.: MAHMUL/2021/81645

# न्याय रणभूमी

निर्भीड पाऊल! न्यायाची चाहूल!



गुढीपाडवा
मराठी नववर्ष निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा!

■ मुख्य संपादक: संदिप रुक्मिणी विठ्ठल कसालकर 9222888002 ■ उपसंपादक: बी. सुदर्शन कदम 9730478708 ■ सहसंपादक: जितेश मुंडयेथ पठथरी 9867463937

Year : 4 ▸▸ Issue : 23 ▸▸ Mumbai ▸▸ Monday 31 March To 06 April 2025 ▸▸ Pages : 8 ▸▸ Prices : Rs. 2.00

### वडिलांचे विवाहबाह्य संबंध आणि पैशाच्या चणचणीमुळे दिशा तणावात

# दिशा सालियन मृत्यूप्रकरणाला ट्विस्ट : मिलिंद सोमणची एन्ट्री!

## अनेक धक्कादायक खुलासे समोर : 'क्लोजर रिपोर्ट' वर नितेश राणे, निरुपम यांचा आक्षेप

▸▸ संदिप कसालकर

बॉलिवूड सेलिब्रिटी टॅलेंट मॅनेजर दिशा सालियान मृत्यूप्रकरणात वेगवेगळी माहिती समोर येत आहे. सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप तिचे वडील सतीश सालियान यांनी केला. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका सुद्धा दाखल केली. त्यानंतर आता या प्रकरणात मोठी अपडेट समोर येत आहे. मालवणी पोलिसांनी यापूर्वीच दिशा सालियान मृत्यूप्रकरणाचा क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. या क्लोजर रिपोर्टमध्ये अत्यंत धक्कादायक खुलासे आहेत. पोलिसांनी दोन सेलिब्रेटींचा जबाब नोंदवला होता. दिशा सालियान काम करत असलेल्या कॉर्नरस्टोन कंपनीच्या जाहिरातीशी थेट सबंधित असलेल्या मिलिंद सोमण आणि दिशा पटणीचा यांचा जबाब मालवणी पोलिसांनी नोंदवला होता. दिशा पटणी आणि मिलिंद सोमण यांनी कॉर्नरस्टोन या कंपनीशी दोन वेगवेगळ्या जाहिरातींसाठी करार केला होता. या दोन्ही सेलिब्रेटींशी संवाद ठेवण्याची आणि बोलणी करण्याची जबाबदारी दिशा सालियनवर होती.

### दररोज नवनवीन खुलासे समोर..

बॉलिवूड सेलिब्रिटी टॅलेंट मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणात वेगवेगळी माहिती समोर येत आहे. सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप तिचे वडील सतीश सालियन यांनी केला असून त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका सुद्धा दाखल केली आहे.

### दिशा मृत्यूप्रकरणी मोठी 'अपडेट' !

मालवणी पोलिसांनी यापूर्वीच दिशा सालियन मृत्यूप्रकरणाचा 'क्लोजर रिपोर्ट' सादर केला होता. या रिपोर्टमध्ये अत्यंत धक्कादायक खुलासे आहेत. पोलिसांकडून दोन सेलिब्रेटींचा जबाब नोंदवला गेला होता.

### दिशा पटणीमुळे सालियन तणावग्रस्त


दिशा सालियन काम करत असलेल्या 'कॉर्नरस्टोन कंपनी' च्या जाहिरातीशी थेट संबंध असलेल्या अभिनेता मिलिंद सोमण आणि दिशा पटणी यांचा जबाब मालवणी पोलिसांनी नोंदवला होता, हे महत्त्वाचे आहे. दिशा पटणी आणि मिलिंद सोमण यांनी 'कॉर्नरस्टोन' या कंपनीशी दोन वेगवेगळ्या जाहिरातींसाठी करार केला होता. या दोन्ही सेलिब्रेटींशी संवाद



ठेवण्याची आणि चर्चा करण्याची जबाबदारी दिशा सालियनवर होती. करारातील गोष्टी करायला सांगितल्या जात असताना दिशा पटणीने नकार दिल्याने दिशा सालियन तणावामध्ये होती, असे आता स्पष्ट होत आहे. करणार नाही, अशी भूमिका सोमण यांनी घेतली होती. कॉर्नरस्टोन कंपनीशी सबंधित या दोन बाबींमुळे दिशा मात्र तणावात होती, हेही एक कारण सांगण्यात आले आहे.

### मिलिंद सोमण काय म्हणाले?

मिलिंद सोमणने एका मोबाईल कंपनीची जाहिरात या कंपनीसोबत केली होती. मात्र करार संपल्यानंतर त्यांनी एक ट्विट केले होते. त्या ट्विटमुळे कंपनी अडचणीत आली होती. त्यावर त्या मोबाईल कंपनीने आक्षेप घेतला होता. करार संपुष्टात आल्याने मी केलेले ट्विट डिलीट



### 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये आत्महत्याच!

पोलिसांच्या 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये दिशाने आत्महत्याच केल्याचे नमूद करत ती कोणत्या कारणास्तव तणावात होती, हे स्पष्ट केले आहे.



### नितेश राणे, संजय निरुपम यांच्या मते सगळेच संशयास्पद!

या 'क्लोजर रिपोर्ट'वर मंत्री नितेश राणे आणि शिवसेना शिंदे गटाचेनेते संजय निरुपम यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. संजय निरुपम यांनी या प्रकरणातील मालवणी पोलिसांचा 'क्लोजर रिपोर्ट' संशयास्पद असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, या प्रकरणाची चौकशी सुरू असताना उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते आणि त्यांच्या मुलगा आदित्य ठाकरे याचे नाव याप्रकरणात आले होते. त्यामुळे या चौकशीवर राजकीय दबाव असू शकतो. निरुपम यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, मालवणी पोलिसांनी सरकारच्या दबावाखाली काहीतरी चौकशी करून निष्कर्ष काढला असावा. दरम्यान, पोलिसांच्या 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये काहीही अर्थ नाही. दिशा सालियन हिच्या मृत्यूचे गूढ अद्याप उकललेले नाही आणि या प्रकरणातील सत्य बाहेर यावे, यासाठी नव्याने सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. पूर्वी देशाचे वकील आणि वडील दोघेही तणावाखाली होते, त्यांनीच आता न्यायालयात धाव घेतली आहे, त्यामुळे तपास हा नि:पक्षपाती व्हावा, असे ते म्हणाले.

वडिलांच्या प्रेमसंबंधाबद्दलची माहिती, कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे व्यवहार करण्यात अपयशी आणि काही आर्थिक बाबींच्या त्रासामुळे दिशा त्रस्त आणि तणावाखाली होती. म्हणून दिशाने आत्महत्या केल्याचा 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये मुंबई पोलिसांचा निष्कर्ष आहे.

# उपाध्यक्ष महोदय हाजिर हो...

## विधानसभा उपाध्यक्षपदी नुकतीच निवड झालेल्या अण्णा बनसोडेंना मुंबई उच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश, आमदारकीला आव्हान देणारी याचिका दाखल

▶▶ संदिप कसालकर

पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पण त्यांच्या या निवडीला दोन दिवस पूर्ण होत नाही तेच आता मुंबई उच्च न्यायालयाकडून बनसोडेंना हजर होण्याचे आदेश आले आहेत. बनसोडे यांच्या आमदारकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणयात आली आहे. त्यामुळे अण्णा बनसोडे यांची आमदारकी धोक्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

मागील वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पिंपरी विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार सुलक्षणा शीलवंत-धर यांनी अण्णा बनसोडेंच्या आमदारकीला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांना २ एप्रिलला न्यायालयात हजर राहावे लागणार आहे. त्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.





अण्णा बनसोडे यांनी विधानसभा निवडणुकीत नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याच संदर्भातील याचिका महाविकास आघाडीच्या उमेदवार सुलक्षणा शीलवंत धर यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या एकलपीठापुढे याचिकेवर सुनावणी पार पडली. या सुनावणीनंतर बनसोडे यांना बुधवारी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता बनसोडे यांच्या आमदारकीवर टांगती तलवार आल्याचे बोलले जात आहे. पण आमदार बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी दोन दिवसांपुर्वीच बिनविरोध निवड झाली. त्यानंतर आता मुंबई उच्च न्यायालयात ही याचिका दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

### अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख

**राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) अण्णा बनसोडे हे सलग तिसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीत आमदारपदी निवडून आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून अण्णा बनसोडे यांची ओळख आहे. तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर त्यांना मंत्रिपदाची अपेक्षा होती. मात्र, इच्छुक जास्त आणि मंत्रिपदे कमी यामुळे महायुती सरकारमध्ये त्यांना मंत्रिपद मिळाले नाही. मात्र, अजित पवारांनी त्यांना विधानसभेच्या उपाध्यक्षपदी संधी दिली आहे. याशिवाय विविध समित्यांवर त्यांना संधी देण्यात आली आहे, त्यामुळे बनसोडे यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमधील वजन वाढल्याचे चित्र आहे.**

# मुंबई पोलिसांचा क्लोजर रिपोर्ट वैध कसा?

## दिशा सालियन मृत्यूप्रकरणी वडील सतीश सालियन यांच्या वकिलांचा सवाल, खोटे पुरावे तयार केल्याचा आरोप

▶▶ साक्षी कीर

दिशा सालियनच्या वडिलांच्या वकिलांनी मालवणी पोलिसांनी यापूर्वी सादर केलेल्या क्लोजर रिपोर्टवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मालवणी पोलिसांनी सादर केलेला क्लोजर रिपोर्ट वैध कसा? या रिपोर्टचा आरोपींना कोणताही फायदा होणार नाही. खोटे पुरावे तयार केल्याप्रकरणी पोलिसांना नोबेल द्यावे लागेल, असे सतीश सालियन यांचे वकील नीलेश ओझा यांनी म्हटले आहे.

दिशा सालियन प्रकरणात शुक्रवारी (दि. २८) मालवणी पोलिसांचा एक क्लोजर रिपोर्ट समोर आला. या रिपोर्टमध्ये दिशाने आपल्या वडिलांच्या म्हणजे सतीश सालियन यांच्या विवाहबाह्य संबंधांना कंटाळून आत्महत्या केल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर सतीश यांचे वकील नीलेश ओझा यांनी उपरोक्त दावा केला आहे.

दिशाच्या वडिलांचे विवाहबाह्य संबंध होते. ती त्यांना पैसे द्यायची. यामुळे निराश होऊन तिने आत्महत्या केली, असे मुंबई पोलिसांनी आपल्या क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटल्याचा दावा केला जात आहे. पण पोलिसांनी हा रिपोर्ट मागे घेतला होता, तर मग तो वैध कसा? हा क्लोजर रिपोर्ट मागे घेतला असेल तर त्यातील गोष्टींना कोणताही अर्थ उरत नाही. त्यानंतर या प्रकरणी एसआयटीची स्थापना झाली. प्रकरणाचा नव्याने तपास सुरू झाला. त्यामुळे आरोपींना या रिपोर्टचा कोणताही फायदा होणार नाही. आत्ता आरोपींच्या प्रवक्त्यांना काय आनंद साजरा करायचाय तो करू द्या, असेदेखील निलेश ओझा म्हणाले.





### दिशाच्या नैराश्याच्या कारणाबाबत मतभिन्नता

**दिशाच्या मृत्यूप्रकरणी आम्ही काही नवे पुरावे मीडियापुढे सादर करत आहोत. दिशाचा मित्र रोहन रायने वर्षभरानंतर एका मुलाखतीत दिशाच्या मृत्यूविषयी काही गौप्यस्फोट केले होते. १५ नोव्हेंबर २०२२ रोजी त्याची एका वृत्तपत्रात मुलाखत छापून आली होती. दिशा प्राण्यांच्या बाबतीत फारच संवेदनशील होती. केरळमध्ये एका गरोदर हत्तीणीसोबत घडलेल्या घटनेमुळे ती नैराश्यात गेली होती, असे तो म्हणाला होता. उलट पोलिसांच्या अहवालात तिच्या वडिलांच्या विवाहबाह्य संबंधांमुळे ती नैराश्यात गेल्याचा दावा करण्यात आला आहे. मालवणी पोलिसांनी या प्रकरणी अनेक खोटे पुरावे तयार केले. यासाठी त्यांना नोबेल पुरस्कार मिळायला हवा, अशी तिरकस टिप्पणी वकील नीलेश ओझा यांनी पत्रकारांशी बोलताना केली.**

# कोरटकरसोबत सीएमओतील प्रतीक पडवेकरही होता का?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुलासा करण्याची प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांची मागणी

▶▶ सलाहुद्दीन शेख

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणारा तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकरला तेलंगणातील मंचरेला येथून अटक करण्यात आल्याचे सरकारने जाहीर केले. परंतु अटक केली त्यावेळी कोरटकरसोबत मुख्यमंत्री कार्यालतील कर्मचारी प्रतीक पडवेकर हादेखील होता. त्याला सोबत घेऊनच कोल्हापूर पोलीस आले, हे खरे आहे का? याचा खुलासा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

आम्हाला जी माहिती मिळाली, त्यानुसार कोरटकरला तेलंगणात अटक करण्यात आली त्यावेळी पडवेकर हा त्याच्यासोबत होता. मग त्याला का लपवून ठेवले आहे? त्याला का दाखवत नाही? महिनाभर कोरटकरला



खरी मदत कोण करत होते, ते पुढे का येत नाही, हा महत्वाचा प्रश्न आहे. त्याच्या अटकेसंदर्भात काही माहिती का लपवली जात आहे? छत्रपती शिवाजी महाराज यांचे खरे प्रेमी असाल तर गृहमंत्र्यांनी सर्व माहिती जाहीर करावी. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान करणारा कोरटकर महिनाभर लपून बसला होता, त्याला कोणी साथ दिली? कोणाच्या आशिर्वादाने तो लपला होता, याची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत आणि महाराष्ट्राच्या जनतेला ती जाणून घेण्याचा हक्क आहे, असेही अतुल लोंढे यावेळी म्हणाले.

# मविआ २०४७ पर्यंत विरोधी बाकावरच बसणार : चंद्रशेखर बावनकुळे

▶▶ अवधुत सावंत

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी 'एका पराभवाने खचणारी आम्ही माणसे नाहीत' असा इशारा सत्ताधाऱ्यांना दिला. पवार यांच्या या इशाऱ्याला उत्तर देताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाविकास आघाडी २०४७ पर्यंत विरोधी बाकावरच बसणार असल्याचा दावा केला आहे.

२०४७ पर्यंत आता शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसला काही वाव नाही, असे वक्तव्य बावनकुळे यांनी केले आहे. शरद पवार यांनी दिल्लीत केलेल्या विधानावर बोलताना बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत भाष्य केले. ‘‘काँग्रेस आणि





महाविकास आघाडीने आता २०४७ पर्यंत वाट पाहावी. २०४७ पर्यंत त्यांनी आपापल्या पक्षात चांगले काम करावे. मी त्यांना विरोधी पक्षात काम करण्याच्या शुभेच्छा देतो,' असा खोचक टोला त्यांनी यावेळी लगावला आहे.

दिल्ली येथे गुरुवारी (दि. २७) गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर दिल्लीत पहिल्यांदाच शरद पवार यांच्या पक्षाची दिल्लीत बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये राज्यात घडणाऱ्या घडामोडींवर म्हणजे औरंगजेबाच्या कबरीवरून सुरु असलेला वाद ते कॉमेडीयन कुणाल कामराविरोधातील वाद अशा अनेक मुद्यांवर बैठकीमध्ये चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. ‘‘देशातील राजकीय परिस्थिती पाहता खंबीर वैचारिक लढा देण्याची हीच वेळ आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागले. पण, एका पराभवाने खचून जाणारी आम्ही माणसे नाहीत,’’ असे म्हणत असे पवार यांनी कार्यकर्त्यांना नव्या उमेदीने लढण्याचा संदेश दिला.

### नेमकं काय म्हणाले बावनकुळे?

**विकसित भारताचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. विकसित भारताला साथ देण्याकरिता संपूर्ण देश पंतप्रधान मोदी यांच्यासोबत उभा आहे. विकसित महाराष्ट्राचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. महाराष्ट्रातील १४ कोटींची जनता फडणवीस यांच्या पाठीशी उभी आहे, ती महायुतीसोबत आहे. त्यामुळे काँग्रेस आणि महाविकास आघाडीने आता २०४७ पर्यंत वाट पाहावी. २०४७ पर्यंत त्यांनी आपापल्या पक्षात चांगले काम करावे. मी त्यांना विरोधी पक्षात काम करण्याच्या शुभेच्छा देतो, असं बावनकुळे यावेळी म्हणाले.**



# नेपाळमध्ये हिंदूराष्ट्रासाठी नागरिक रस्त्यावर

## राजेशाही लागू करण्यासाठी आंदोलन, पोलिसांशी चकमकीत दोघांचा मृत्यू, २० पेक्षा जास्त लोक जखमी

▶▶ विशेष प्रतिनिधी

नेपाळमध्ये राजेशाहीचे समर्थक आणि सुरक्षा दलांच्या चकमकीत शुक्रवारी (दि. २८) दोन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. त्यात एका पत्रकाराचा समावेश आहे. या घटनेत २० पेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत. नेपाळची राजधानी काठमांडूमध्ये राजेशाहीच्या समर्थकांचे 'शक्ती प्रदर्शन' सुरू झाले आहे. आजूबाजूच्या परिसरातील दुकाने, घरे आणि राजकीय पक्षांच्या कार्यालयांमध्ये जाळपोळ आणि लूटमार सुरू झाली. पोलिसांकडून बळाचा वापर केल्याचे फुटेजही सतत समोर येत आहेत. शेवटी शहरात कर्फ्यू लागू करण्यात आला.

एक व्हीडिओ व्हायरल झाला. त्या व्हीडिओमध्ये या आंदोलनाचे नेते दुर्गा प्रसाई हे वेगाने कार चालवून बॅरिकेड्स तोडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. व्हीडिओमध्ये दुर्गा प्रसाई पोलिसांचा घेरा तोडून जवळच्या आंदोलकांना पुढे जाण्याचं आवाहन करताना दिसत आहेत. त्यानंतर ही गर्दी नियंत्रणाच्या बाहेर जात असल्याचेही फुटेज व्हायरल होऊ लागले. या चकमकींदरम्यान दोन जणांचा मृत्यू झाल्याचीही पुष्टी झाली आहे.

**जेव्हा रिपब्लिकन पक्ष लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात तेव्हा राजेशाही समर्थक डोके वर काढण्याचा प्रयत्न करतात. लोकशाही व्यवस्था चालवणारे लोक जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरल्यानंतर या लोकांनी डोके वर काढले आहे. आम्ही स्वतःकडे बारकाईने पाहत आहोत आणि आमच्या चुकांमधून शिकत आहोत. तसंच लोकांसाठी, जनतेसाठी आणि आमच्या सर्वांसाठी उभे आहोत.**

– **पुष्पकमल दहल प्रचंड,** प्रमुख आणि माजी पंतप्रधान नेपाळ कम्युनिस्ट पक्ष (माओवादी)



### राजेशाहीचं समर्थन करणाऱ्या नेत्यांबाबत प्रश्न?

**शुक्रवारी झालेल्या राजेशाही समर्थकांच्या निदर्शनांमध्ये खाजगी आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्यानंतर त्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. राजकीय विश्लेषक कृष्णा पोखरेल यांच्या मते, 'राजेशाही समर्थकांना असे वाटले असेल की अशा परिस्थितीत ते काहीही बोलू शकतात आणि काहीही करू शकतात. त्यातून अनेकांना स्वतःकडे आकर्षित करू शकतो असे त्यांना वाटते आणि यातूनच त्यांनी प्रसाईंना पुढे केले. त्यांना असा विश्वास होता की 'लोकांची एक मोठी लाट उसळेल आणि व्यवस्था उलथून टाकेल'.**

### दुर्गा प्रसाई राजेशाही समर्थक चळवळीचा चेहरा



दि.२८ मार्चच्या दिवशीच रिपब्लिकन विचारांकडे झुकणाऱ्या सोशलिस्ट फ्रंटने काठमांडूमध्ये आंदोलन केले. त्यात अनेक नेते संबोधित करणार होते. परंतु राजेशाही समर्थक आणि पोलिसांमध्ये झालेल्या संघर्षानंतर राजेशाही समर्थकांना भाषणे करता आली नाहीत. माजी माओवादी आणि यूएमएलच्या शेवटच्या महाअधिवेशनाचे केंद्रीय सदस्य असलेले प्रसाई हे अल्पावधीतच राजेशाही चळवळीचा प्रमुख चेहरा बनले आहेत. त्यांच्यातल्या या बदलाचे अनेकजण साक्षीदार आहेत.

**आज सामान्य जनतेसमोर एकच प्रश्न आहे इतर पक्ष की दुर्गा प्रसाई-राजा? हीच काळाची गरज देखील आहे.**

– **दुर्गा प्रसाई,** सोशलिस्ट फ्रंट


**आम्ही स्टेजवर येत असताना पोलिसांनी आम्हाला पकडले आणि त्यानंतर परिस्थिती आणखी बिकट झाली." ते म्हणाले, "स्टेजवरच प्लास्टिकच्या गोळ्या आणि अश्रूधुराचा मारा करण्यात आला. आम्ही बैठक घेऊन पुढे काय करायचं ते ठरवणार आहोत.**

– **धवल शमशेर जबरा,** राष्ट्रीय प्रजातंत्र पक्ष

आंदोलनाच्या एक दिवस आधी, गुरुवारी (दि.२७) माजी राजे ज्ञानेंद्र शाह यांच्याशी भेट घेतल्यानंतर, दुर्गा प्रसाई यांनी सांगितले होते की, राजेशाही आणि हिंदू राज्याची स्थापना हा त्यांचा 'धर्म' आहे. त्याच दिवशी त्यांना राजेशाहीचे समर्थन करणाऱ्या संयुक्त लोक चळवळ समितीचे कमांडर म्हणून नियुक्त करण्यात आले.

# सभागृहाचे कामकाज पक्षाप्रमाणे कसे चालेल?

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा राहुल गांधींवर पलटवार



### सदस्यांकडून नियमांचे पालन अनिवार्य - ओम बिर्ला



**राहुल गांधी यांनी केलेल्या या आरोपानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहातील सर्व सदस्यांनी नियमांचे पालन करून सभागृहाचे पावित्र्य जपायला हवे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली आहे. एक प्रकारे राहुल गांधी यांच्याकडून काही नियमांचा भंग झाल्यामुळे त्यांना अशा प्रकारे बोलू दिले जात नाही असा युक्तिवाद ओम बिर्ला यांनी केला आहे. लोकसभेचे कामकाज कशाप्रकारे चालावे याबाबत जो ३४९ क्रमांकाचा नियम आहे त्यामध्ये लोकसभेतील सदस्यांनी सभागृहात कशाप्रकारे वर्तन ठेवावे याची मोठी यादी सांगण्यात आली आहे. त्या यादीतील कोणत्या नियमांचे पालन करण्यात राहुल गांधी अपयशी ठरले याचा खुलासा ओम बिर्ला यांनी केला नाही. पण राहुल गांधी यांनी जेव्हा लोकसभेच्या सभागृहामध्ये आपल्याला बोलायला मिळावे अशी मागणी केली तेव्हा त्यांनी लोकसभेचे कामकाज स्थगित करण्याचा निर्णय घेतला. विरोधी पक्षनेते असो किंवा इतर सदस्य असो त्यांनी काही किमान नियमांचे पालन करावे अशा प्रकारची अपेक्षा ओम बिर्ला यांनी व्यक्त केली**

▶▶ विशेष प्रतिनिधी

संसदेच्या सभागृहाचे कामकाजविषयक नियम असतात, प्रक्रिया असते. हे लोकसभेमधील विरोधी पक्षनेत्यांना कदाचित माहिती नसावे. त्यांचा काँग्रेस पक्ष चालतो त्याप्रमाणेच सभागृहाचे कामकाज चालावे, अशी त्यांची अपेक्षा कशी काय पूर्ण करता येईल. लोकसभेत बोलण्यासाठी त्यांना जो वेळ देण्यात आला होता. तेव्हा ते व्हिएतनाममध्ये होते. परतून आल्यावर लगेच मला बोलू द्यावे, असा अट्टाहास कसा काय धरता येईल, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस नेते राहू गांधी यांच्यावर निशाणा साधलेला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेमधील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्याला सभागृहात बोलू दिले जात नसल्याचा आरोप करता असतात. त्यांच्या या आक्षेपाबाबत अमित शाह यांनी सविस्तर भाष्य केले आहे. राहुल गांधी यांनी संसदेच्या कार्यपद्धतीवर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना अमित शाह म्हणाले की, सभागृहात बोलण्याचे काही नियम असतात हे लोकसभेमधील विरोधी पक्षनेत्यांना कदाचित माहिती नसावे. सभागृह मनमानी पद्धतीने चालवता येत नाही. सभागृहाचे कामकाज त्यांचा काँग्रेस पक्ष चालतो त्याप्रमाणे कसे चालेल? त्यांना अर्थसंकल्पावर चर्चेसाठी ४२ टक्के वेळ देण्यात आली होती. आता कुणी बोलावे हा त्यांचा प्रश्न आहे. मात्र जेव्हा संसदेत गंभीर विषयांवर चर्चा सुरू होती, तेव्हा ते व्हिएतनाममध्ये होते. तसेच जेव्हा ते माघारी परतले, तेव्हा त्यांनी आपल्या इच्छेनुसार बोलण्याचा हट्ट सुरू केला. संसदेचे कामकाज हे नियम आणि प्रक्रियांनुसार चालते. एका कुटुंबाकडून चालवण्यात येणाऱ्या काँग्रेस पक्षाप्रमाणे चालत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

विरोधी पक्षाच्या नेत्याने सरकारी आकडेवारीवरून बोलायचे असते. प्रसंगी सत्ताधाऱ्यांना घेरायचे असते. दुर्दवाने राहुल गांधी एनजीओने दिलीये भाषणे जशीच्या तशी वाचून दाखवतात. अशा भाषणामुळे त्यांची फसगत होते. सभागृहाची स्वतःची अशी कार्यपद्धती आहे, नियमावली असते. पक्षात ज्याप्रमाणे मनमानी कारभार करता येतो, तसाच तो सभागृहात करता आला पाहिजे, अशी अपेक्षा करणे गैर आहे, असेही शाह म्हणाले आहेत. तसेच कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने मुस्लिमांसाठी केलेल्या ४ टक्के आरक्षणाच्या घोषणेचा उल्लेख शाह यांनी लॉलीपॉप असा केला आहे. धर्माच्या आधारावर कुठलेही आरक्षण हे घटनेचे उल्लंघन आहे.


### मला बोलूच दिले जात नाही - राहुल गांधी

**संसदेच्या सभागृहामध्ये आपल्याला भाषण करू दिले जात नाही किंवा कोणत्याही विषयावर मत व्यक्त करू दिले जात नाही', अशा प्रकारचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. सध्या सुरू असलेल्या लोकसभेच्या अधिवेशनामध्ये राहुल गांधी यांना महाकुंभमेळावर बोलायचे होते, तसेच देशातील बेरोजगारीच्या विषयावर त्यांना भाषण करायचे होते. पण या दोन्ही विषयांवर आपल्याला बोलण्याची परवानगी मिळाली नाही असा दावा राहुल गांधी यांनी केला आहे.सभागृह लोकशाही मार्गाने चालवले जात नाही, असा गंभीर आरोपही त्यांनी लोकसभेच्या अध्यक्षांवर केला आहे. सभागृहात एखाद्या विषयावर जेव्हा चर्चा सुरू होते तेव्हा प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना त्यांच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात काही मिनिटे चर्चेमध्ये बोलण्यासाठी दिली जातात. राहुल गांधी यांच्या पक्षाची सदस्य संख्या किंवा त्यांना मिळालेले विरोधी पक्ष नेतेपद पाहता नेहमीच त्यांना भाषणासाठी जास्त कालावधी दिला जातो किंवा विरोधी पक्ष नेत्याला जास्त कालावधी देण्याची प्रथाही आहे. पण गेल्या काही कालावधीपासून राहुल गांधी यांनी सभागृहात कोणते मुद्दे मांडू नयेत याच दिशेने कामकाज सुरू असल्याचे दिसते. किमान तसा आरोप तरी काँग्रेस पक्षाकडून केला जात आहे. विरोधी पक्षाचा सभागृहामध्ये योग्य सन्मान राखला जात नाही अशी तक्रारही काँग्रेसच्या सत्तर खासदारांनी लोकसभेच्या अध्यक्षांकडे केली आहे. काही वर्षांच्या कालावधीपासून लोकसभेचे व्यासपीठ असो किंवा इतर प्रतिनिधीगृहांची व्यासपीठ असोत तेथे गोंधळ करणे हाच एक कलमी कार्यक्रम राबवला जातो आणि सर्वसाधारणपणे हा गोंधळ विरोधी पक्षांकडून अपेक्षित असला तरी अनेक वेळा सत्ताधारी पक्षांच्या सदस्याकडूनही गोंधळाचे नियोजन केले जाते.**

# भर उन्हाळ्यात शाळांचा अट्टाहास कशासाठी?

## राज्य शिक्षण संस्था महामंडळाचा २५ एप्रिलपर्यंत शाळा सुरू ठेवण्यास विरोध; प्रसंगी न्यायालयात दाद मागण्याचाही दिला इशारा





**विशेष प्रतिनिधी**

राज्यातील सर्व शाळांमध्ये एकाचवेळी वार्षिक परीक्षा व दुसरी संकलित मूल्यमापन चाचणी आयोजित करण्याची सूचना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत (एससीईआरटी) करण्यात आली होती. यामुळे राज्यातील शाळा एप्रिलमध्ये सुरू राहणार आहेत. या निर्णयास महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने विरोध केला आहे. एवढ्या उन्हाळ्यात शाळा सुरु ठेवण्याचा अट्टाहास कशासाठी, असा सवाल महामंडळाचे सरचिटणीस रवींद्र फडणवीस यांनी उपस्थित केला आहे. राज्य सरकारने आपल्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार केला नाही तर याप्रकरणी न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे.

शाळांअंतर्गत परीक्षा घेण्याचे अधिकार मुख्याध्यापक आणि शाळा प्रशासनाचे आहेत. पूर्ण एप्रिलमध्ये शाळा सुरू ठेवण्याचा आदेश चुकीचा आहे. याबाबत शिक्षणमंत्र्यांना वारंवार पत्र पाठवले आहे. सरकारच्या आदेशानुसार २ ते २५ एप्रिलपर्यंत परीक्षा घ्यावी लागणार आहे. प्राथमिक शाळा २०० दिवस आणि उच्च प्राथमिक शाळा २२० दिवस घ्यायचा निर्णय झाला आहे. त्यानुसार शाळांचे दिवस पूर्ण झाले आहेत. मग २२ एप्रिलपर्यंत शाळा का सुरू ठेवायच्या आहेत, असा प्रश्न महामंडळाने विचारला आहे.

सरकारच्या निर्णयामुळे मोठ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आधी आणि प्राथमिक शाळेच्या लहान विद्यार्थ्यांची परीक्षा उशिरा संपणार आहे. परीक्षा संपतील त्याच दिवशी पेपर तपासायचे, असे शिक्षणमंत्र्यांनी सांगितले आहे. मोठ्या शाळांत हे कसे शक्य होणार? असा प्रश्न महामंडळाने विचारला आहे. त्यामुळे या प्रकरणात आता कोर्टात जाण्याशिवाय पर्याय नाही. न्यायालयाने यापूर्वी निर्णय दिला आहे की, विदर्भातील तापमान पाहता शाळा प्रशासनाने निर्णय घ्यावा. त्यानंतर सरकारने पत्रक काढले होते. स्वतः काढलेले पत्रक सरकारच विसरले आहे, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

### विदर्भ उन्हाळा विद्यार्थ्यांसाठी धोकादायक

**विदर्भ मराठवाड्यातील कडक उन्हात २५ एप्रिलपर्यंत प्राथमिक शाळा सुरू ठेवणे चुकीचे आहे. कारण या दोन्ही प्रदेशात उन्हाचा पारा वाढलेला असतो. ४० अथवा त्यापेक्षा अधिकच्या तापमानात विद्यार्थ्यांना शाळेत बोलावणे हा त्यांच्या आरोग्याशी खेळ असल्याची भावना संस्थाचालकांसह पालकांमधून व्यक्त होत आहे.**

# फुकटच्या सरकारी योजना बंद करा

## खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे मुख्य सचिवांचे आदेश



**विशेष प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' यासारख्या लोकानुयायी योजनांमुळे सरकारी तिजोरीवरील बोजा वाढल्याने राज्य सरकारने सर्वच स्तरावर काटकसरीचे धोरण स्वीकारलेले दिसते. या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करताना विभागाला दिलेल्या नियतव्ययाच्या प्रमाणात किती पट वाढ होणार आहे, हे नमूद केल्याशिवाय मंत्रिमंडळासमोर नवे प्रस्ताव सादर करण्यात येऊ नयेत, अशी सक्त ताकीद मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी सर्व विभागांना दिली आहे. याशिवाय अनुत्पादक खर्च मर्यादित ठेवण्यासह फुकटच्या सरकारी योजना बंद करण्याच्या अथवा त्यांचे एकत्रीकरण करण्याच्या सूचना विभागांना देण्यात आल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील परिपत्रक जारी केले. नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २०२५-२०२६ या वर्षाचा ४५ हजार कोटींच्या महसूली तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. अर्थसंकल्पानुसार चालू आर्थिक वर्षात राज्य सरकारला खर्चासाठी ७ लाख २० कोटी उपलब्ध आहेत. महसुली जमेचा विचार करता यंदा ४५ हजार ८९१ कोटी तूट अंदाजित असून १ लाख ३६ हजार २३५ कोटी राजकोषित तूट येणार आहे. राज्याची ही बिकट परिस्थिती पाहता खर्च आटोक्यात आणण्यासाठी काटकसरीचे विविध मार्ग योजण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. महसुली जमेच्या ५८ टक्के तरतूद ही अनिवार्य खर्चासाठी खर्ची पडत असून तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करुन हा खर्च मर्यादित ठेवा. विभागांनी प्रस्ताव सादर करताना योजनांवर झालेला खर्च, दिलेल्या प्रशासकीय मान्यता तसेच उपलब्ध नियतव्यय आणि दायित्व याबाबत तपशील द्यावा. नव्या प्रस्तावामुळे विभागाच्या नियतव्ययमध्ये किती पट वाढ होणार आहे, याची माहिती मंत्रिमंडळ टिपण्णीमध्ये देण्याची सूचना मुख्य सचिवांनी परिपत्रकात केली आहे.

अनुत्पादक खर्च कमी करा. योजनांचे एकत्रीकरण करा. उत्पादक भांडवली खर्च वाढवा तसेच फुकटच्या योजना बंद करा. अनिवार्य खर्चाबाबत वित्त विभागाचे तसेच कार्यक्रम खर्चाबाबत वित्त आणि नियोजन विभागाचे अभिप्राय असल्याशिवाय मंत्रिमंडळ प्रस्ताव सादर करण्यात येऊ नयेत. मंत्रिमंडळाने योजनेच्या आर्थिक भारामध्ये बदल सुचवल्यास शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी वित्त आणि नियोजन विभागाची पूर्वसंमती घ्यावी, असेही या परिपत्रकात म्हटले आहे.

# पदभरती महाराष्ट्राची, परीक्षा गुजरातमध्ये!

## फॉरेन्सिक लॅबमध्ये पदभरतीसाठीची ५ एप्रिल रोजी लेखी परीक्षा; केंद्र गांधीनगरला

**विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विविध उद्योग हे गुजरातला पळवले जातात असा आरोप विरोधकांकडून अनेकदा केला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुजरातचे असल्यामुळे उद्योगांसाठी गुजरातला प्राधान्य दिले जाते, अशीही टीका होत आहे. परंतु, आता उद्योगानंतर चक्क महाराष्ट्रातील परीक्षेचे केंद्रच गुजरातला पळवल्याचा प्रकार समोर आला आहे. या परीक्षेचे केंद्रही गुजरातच्या एका कंपनीला देण्यात आले आहे. यामुळे राज्यभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड रोष आहे. राज्याच्या गृहविभागातील फॉरेन्सिक लॅबमध्ये पदभरती करण्यासाठी ५ एप्रिल रोजी लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. गुजरातच्या एजन्सीमार्फत ही परीक्षा होत असून, सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्रासाठी जरी पदभरती असली तरी परीक्षेचे केंद्र मात्र गुजरातमध्ये आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांवर हा अन्याय असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागातील फॉरेन्सिक लॅबमध्ये वैज्ञानिक सहायक आणि सहायक रासायनिक विश्लेषक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. परंतु, या भरतीची लेखी परीक्षा थेट गुजरातमध्ये घेतली जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. १७ डिसेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार कंत्राटी पद्धतीने ही भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वैज्ञानिक सहायक पदांसाठी फॉरेन्सिक अॅप्टीट्युड अँड कॅलिबर टेस्ट परीक्षा घेण्यात येणार आहे, तर सहायक रासायनिक विश्लेषक पदांसाठी १६६ जागांची भरती प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे ही प्रक्रिया गुजरातमधील नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटी मार्फत पार पडत आहे. उमेदवारांची निवड करण्यासाठी ५ आणि ७ एप्रिल रोजी लेखी परीक्षा घेतली जाणार आहे, परंतु महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी परीक्षा केंद्र गुजरातमधील गांधीनगर येथे निश्चित करण्यात आले आहे.

### परीक्षार्थींवर निष्कारण भार

**ही भरती महाराष्ट्रातील फॉरेन्सिक लॅबसाठी होत असली तरी परीक्षेसाठी राज्यात एकही परीक्षा केंद्र ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्रातून गुजरातला जाण्यासाठी थेट रेल्वे सुविधा नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या प्रवासाचा खर्च सहन करावा लागणार आहे. शिवाय, राहण्याची व्यवस्था आणि इतर खर्चाचा भार देखील वाढणार आहे. या अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा देता येणार नाही, अशी शक्यता वर्तवली जात आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, जेव्हा ही भरती महाराष्ट्रासाठी आहे, तेव्हा परीक्षेची केंद्रेही राज्यात असली पाहिजेत. मुंबई आणि नागपूर येथे परीक्षा केंद्रे उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अनावश्यक प्रवास करावा लागणार नाही.या प्रकारानंतर महाराष्ट्रातील फॉरेन्सिक सायन्सचे विद्यार्थी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गेले आणि त्यांनी ही परीक्षा महाराष्ट्रातच घेण्याची मागणी केली. राज्यातील अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज दाखल केले आहेत. मात्र, त्यांना महाराष्ट्रात परीक्षा देता येणार नाही, ही मोठी अडचण आहे. त्यामुळे परीक्षा केंद्रे मुंबई आणि नागपूर येथे निश्चित करण्यात यावीत, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन परीक्षा केंद्रांचा फेरविचार करावा, अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा आहे. यासंदर्भात गृह विभागाची प्रतिक्रिया जाणून घेण्याकरिता गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याशी फोनवरून संपर्क केला रस्ता संपर्क होऊ शकला नाही.**

### सध्या तरी शेतकऱ्यांना कर्जमाफी शक्य नाही - अजित पवार

**कर्ज माफ करावे अशी सध्या राज्याची आर्थिक स्थिती नाही, पैशांचे सोंग आणता येत नाही, याचा पुनरुच्चार करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, शेतकऱ्यांसह अन्य कर्जदारांनी कर्जमाफीचा विचार सोडून द्यावा आणि ३१ मार्चपर्यंत बँकांचे पैसे त्वरित भरावे, असे आवाहन शुक्रवारी (दि. २८) केले. मी महाराष्ट्राचा ११ वेळा लोकाभिमुख अर्थसंकल्प सादर केला. शेतकऱ्यांना वीज माफी दिली, पीक कर्जाच्या व्याजात सवलत दिली, दुधाचे अनुदान दिले, लाडकी बहीण योजनेसाठी सुमारे ४० हजार कोटींचा बोजा सरकारने पेलला. यापुढे अर्थव्यवस्थेला पोषक वातावरण तयार करण्यासाठी शिस्तीने वागण्याची जबाबदारी जशी राज्यकर्त्यांची आहे तशी प्रत्येक घटकांचीही आहे, अशी भूमिकाही पवार यांनी मांडली आहे.**

# प्रताप सरनाईकांचे एसटीचे अध्यक्षपद कागदावरच

**विशेष प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांना हटवून एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर प्रताप सरनाईक यांच्या नियुक्तीचा आदेश काढला मात्र अद्याप तो कागदावरच आहे.

एक महिना झाला तरी सरनाईक यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे देण्यात आली नाहीत. मागील काही वर्षांपासून परिवहन मंत्र्यांकडेच एसटीचे अध्यक्षपद सोपविण्याची परंपरा सुरु झाली होती. त्यानुसार मंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सरनाईक यांनी महामंडळ अधिकाऱ्यांसोबत बैठका सुरू केल्या होत्या. या बैठकांमधून काही निर्णयसुद्धा घेण्यात आले.

पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर नियुक्ती केली. हा एक प्रकारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री सरनाईक यांना धक्का होता. या अनपेक्षित नियुक्तीबद्दल शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली असता, फडणवीस यांनी आपला निर्णय मागे घेत सरनाईक यांची महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. याबाबत आदेशही काढला. परंतु, मुख्यमंत्री फडणवीस यांचा आदेश एसटीच्या अधिकाऱ्यांना समजला नाही. त्यामुळे नेमका आदेश जाणून घेण्यासाठी त्यांनी फडणवीस यांचे पत्र शासनाच्या विधी विभागाकडे पाठवले आहे.

दरम्यान, एसटी महामंडळाचे अध्यक्षपद रिक्त असल्याची संधी साधून राज्यातील बस स्थानके आणि आगाराच्या आवारातील जाहिरातीच्या जागांचे कंत्राट देण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचलनालयाने निविदा काढली आहे.

# सुनीता विल्यम्सने अंतराळात 9 महिने कसे काढले?

# 1 एप्रिलला उलगडणार रहस्य; शेअर करणार अंतराळातील अनुभव




▶▶ संदिप कसालकर

नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स, बॅरी 'बुच' विल्मोर आणि निक हेग १ एप्रिल रोजी त्यांच्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमेतील अनुभव शेअर करण्यासाठी पत्रकार परिषद घेणार आहेत. ही पत्रकार परिषद भारतीय वेळेनुसार मध्यरात्री १२ वाजता आयोजित केली जाईल. या पत्रकार परिषदेत, सुनीता विल्यम्स आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या मोहिमेदरम्यान अनुभवलेल्या अद्वितीय क्षणांबद्दल आणि अंतराळातील जीवनाबद्दल चर्चा केली. या मोहिमेच्या दरम्यान, तांत्रिक अडचणींमुळे विल्यम्स आणि विल्मोर यांना अपेक्षित ८ दिवसांच्या अंतराळ प्रवासाच्या ऐवजी २८६ दिवस अंतराळात राहावे लागले. मात्र, या विस्तारित मोहिमेमध्ये त्यांनी ९०० तासांहून अधिक वैज्ञानिक संशोधन केले आणि १५० हून अधिक प्रयोग यशस्वीरीत्या पूर्ण केले. १८ मार्च रोजी पृथ्वीवर परतल्यानंतर, सुनीता विल्यम्स, बॅरी विल्मोर, निक हेग आणि रशियन अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव्ह यांचे परतीचे शौर्य ही एक ऐतिहासिक घटना बनली. त्यांच्यापैकी गोर्बुनोव्ह यांना त्यांच्या व्यस्ततेमुळे या पत्रकार परिषदेला उपस्थित राहता आले नाही. परंतु त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान दिले. विल्यम्स आणि विल्मोर यांच्या अंतराळ प्रवासामध्ये वनस्पतींची वाढ, स्टेम सेल तंत्रज्ञान, अवकाशातील पदार्थांचे विघटन आणि सूक्ष्मजीवांचा अभ्यास यावर अनेक महत्त्वपूर्ण प्रयोग केले गेले. त्याचप्रमाणे, त्यांनी अंतराळ स्थानकाच्या बाहेर सूक्ष्मजीवांच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी अंतराळात फिरून नमुने गोळा केले.

## मध्ये पहिले आंशिक सूर्यग्रहण! जेव्हा चंद्र सूर्याला अडवतो, अद्भुत फोटो व्हायरल

▶▶ सुदर्शन कदम

शनिवारी २०२५ च्या पहिल्या आंशिक सूर्यग्रहणाचा थरारक अनुभव अनेक देशांमध्ये पाहायला मिळाला. चंद्र पृथ्वी व सूर्याच्या मध्ये येऊन सूर्याचा काही भाग झाकत होता, ज्यामुळे आकाशात अर्धचंद्राकार सूर्याचे अद्भुत दृश्य दिसले. अमेरिका, कॅनडा, कॅरिबियन बेटे, युरोप, रशिया आणि आफ्रिकेच्या काही भागांमध्ये हे सूर्यग्रहण स्पष्टपणे पाहता आले.



### उत्तर अमेरिका आणि युरोपमध्ये उत्साह

उत्तर अमेरिका, विशेषतः ईशान्येकडील भागात, पहाटेच सूर्यग्रहणाचा प्रारंभ झाला. लंडनमध्ये सकाळी ११ वाजता ग्रहणाचा सर्वोच्च बिंदू गाठला. संपूर्ण ब्रिटनमध्ये सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत लोकांनी सूर्यग्रहण पाहिले. युरोपच्या उत्तर आणि पश्चिम भागांमध्ये तसेच उत्तर-पश्चिम आफ्रिकेतील काही भागांमध्येही हा अद्भुत नजारा दिसला.

### ग्रहणाचा थरार – खगोलप्रेमींसाठी पर्वणी

रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे उपकार्यकारी संचालक रॉबर्ट मॅसी म्हणाले, 'ग्रहण पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. लोकांमध्ये प्रचंड उत्साह होता. विशेष सुरक्षा चष्मे घालून आणि दुर्बिणींच्या मदतीने लोकांनी हा अनोखा क्षण अनुभवला.' ब्रिटनच्या हवामान खात्याचे तज्ज्ञ ॲलेक्स बर्किल यांनी सांगितले, 'ब्रिटनच्या उत्तर-पश्चिम भागात सूर्यग्रहणाचा प्रभाव अधिक दिसला, तर आग्नेय भागात तो तुलनेने कमी होता. तरीही ३०% सूर्य झाकल्याचे दृश्य लोकांनी पाहिले.'






# संपादकीय

## भाषणबंदीचा आरोप



संदिप रुक्मिणी विठ्ठल कसालकर
संपादक, न्याय रणभूमी

'लोकसभेच्या सभागृहामध्ये आपल्याला भाषण करू दिले जात नाही किंवा कोणत्याही विषयावर मत व्यक्त करू दिले जात नाही', अशा प्रकारचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केल्यामुळे एका नव्या चर्चेला विषय मिळाला आहे. अर्थात, राहुल गांधी यांनी केलेल्या या आरोपानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहातील सर्व सदस्यांनी नियमांचे पालन करून सभागृहाचे पावित्र्य जपायला हवे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली आहे.एक प्रकारे राहुल गांधी यांच्याकडून काही नियमांचा भंग झाल्यामुळे त्यांना अशा प्रकारे बोलू दिले जात नाही असा युक्तिवाद अप्रत्यक्षपणे ओम बिर्ला यांनी केला आहे. अर्थात, कोणत्या नियमांचा भंग केला आणि त्यामुळे लोकसभागृहाच्या पावित्र्याला धक्का पोहोचला याची माहितीच नसल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. लोकसभेचे कामकाज कशाप्रकारे चालावे याबाबत जो 349 क्रमांकाचा नियम आहे त्यामध्ये लोकसभेतील सदस्यांनी सभागृहात कशाप्रकारे वर्तन ठेवावे याची मोठी यादी सांगण्यात आली आहे. त्या यादीतील कोणत्या नियमाचे पालन करण्यात राहुल गांधी अपयशी ठरले याचा कोणताही खुलासा ओम बिर्ला यांनी केला नाही. पण राहुल गांधी यांनी जेव्हा लोकसभेच्या सभागृहामध्ये आपल्याला बोलायला मिळावे अशी मागणी केली तेव्हा त्यांनी लोकसभेचे कामकाज स्थगित करण्याचा निर्णय घेतला. विरोधी पक्षनेते असो किंवा इतर सदस्य असो त्यांनी काही किमान नियमांचे पालन करावे अशा प्रकारची अपेक्षा ओम बिर्ला यांनी व्यक्त केली असली तरी त्यामुळे कोणताही स्पष्ट खुलासा झालेला नाही, उलट संभ्रम वाढला आहे. सध्या सुरू असलेल्या लोकसभेच्या अधिवेशनामध्ये राहुल गांधी यांना महाकुंभमेळावर बोलायचे होते, तसेच देशातील बेरोजगारीच्या विषयावर त्यांना भाषण करायचे होते. पण या दोन्ही विषयांवर आपल्याला बोलण्याची परवानगी मिळाली नाही असा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. सभागृह लोकशाही मार्गाने चालवले जात नाही, असा गंभीर आरोपही त्यांनी लोकसभेच्या अध्यक्षांवर केला आहे. गृहात एखाद्या विषयावर जेव्हा चर्चा सुरू होते तेव्हा प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना त्यांच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात काही मिनिटे चर्चेमध्ये बोलण्यासाठी दिली जातात. राहुल गांधी यांच्या पक्षाची सदस्य संख्या किंवा त्यांना मिळालेले विरोधी पक्ष नेतेपद पाहता नेहमीच त्यांना भाषणासाठी जास्त कालावधी दिला जातो किंवा विरोधी पक्ष नेत्याला जास्त कालावधी देण्याची प्रथाही आहे. पण गेल्या काही कालावधीपासून राहुल गांधी यांनी सभागृहात कोणते मुद्दे मांडू नयेत याच दिशेने कामकाज सुरू असल्याचे दिसते.

# अन्वयार्थ : 'रायसीना डॉयलॉग'ची दशकपूर्ती

**'रायसीना डायलॉग'सारख्या व्यासपीठाची महत्त्वपूर्ण भूमिका वाढत आहे. या मंचावरून भारताने आपले परराष्ट्र धोरण अधिक स्पष्टपणे जगासमोर मांडले आहे.**

रायसीना डायलॉगच्या आयोजनाला एक दशक पूर्ण झाले. या दहा वर्षांच्या काळात रायसीना डायलॉग भारताच्या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवर मंथन करण्याचे एक प्रभावी व्यासपीठ म्हणून स्थापित झाले आहे. या संवादामध्ये राष्ट्रप्रमुख, मंत्री, राजनैतिक तज्ज्ञ, शैक्षणिक संस्था आणि माध्यम प्रतिनिधी यांसारख्या विविध क्षेत्रातील हितधारकांचा सक्रिय सहभाग असतो. ऑब्जर्वर रिसर्च फाउंडेशन आणि भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेत यंदा 130 हून अधिक देशांमधील साडेतीन हजार पेक्षा जास्त प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफ़र लक्सन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह रायसीना डायलॉगच्या दहाव्या आवृत्तीचे उद्घटन केले. या परिषदेदरम्यान सध्याच्या भू-राजकीय आणि भू-अर्थशास्त्रीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर विविध जागतिक मुद्द्यांवरील समन्वय वाढवण्यासाठी संभाव्य पर्यायांवर चर्चा झाली. अलीकडच्या काळात जागतिक समीकरणे झपाट्याने बदलत आहेत. विशेषतः अमेरिकेत माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुनरागमनाने या बदलांच्या गतीत अधिक वाढ झाली आहे. या परिस्थितीत अनेक देशांना आपल्या धोरणांचे पुनरावलोकन करून नव्या परिस्थितीनुसार रणनीती बदलावी लागत आहे. हा बदल इतका वेगवान आहे की सध्याच्या काळाला स्ट्रॅटेजिक री-अलाइनमेंट म्हणजेच रणनीतीच्या पुनर्बांधणीचा कालखंड म्हणणे वावगे ठरणार नाही. या बदललेल्या परिस्थितीचा प्रभाव रायसीना डायलॉगच्या विविध चर्चासत्रांवरही स्पष्ट दिसून आला. रायसीना डायलॉगमध्ये सहभागी झालेल्या जागतिक हितधारकांनी सध्याच्या परिस्थितीत आपली भूमिका अधिक ठोस करण्यासाठी संभाव्य अजेंडा मांडला. यामध्ये प्रमुख चर्चा जागतिक संस्थांच्या उपयुक्ततेवर आणि त्यांची सध्याच्या काळातील प्रासंगिकतेवर झाली. या मंचावर असे मत मांडण्यात आले की अस्तित्वाच्या संकटाला सामोरे जात असलेल्या अनेक जागतिक संस्थांना जर आपली उपयुक्तता टिकवून ठेवायची असेल, तर त्यांना आपली भूमिका आणि कार्यपद्धतीत बदल करावा लागेल. ज्या वेळी आणि ज्या परिस्थितीत या संस्थांची स्थापना झाली, त्यानंतरच्या काळात जग मोठ्या प्रमाणात बदलले आहे. मात्र, या संस्थांनी स्वतःमध्ये त्या प्रमाणात बदल केलेला नाही. त्यामुळे त्यांच्यावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. ज्या समस्यांच्या समाधानासाठी या संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या, त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत या संस्था सातत्याने अपयशी ठरत आहेत. हे लपून राहिलेले नाही की संयुक्त राष्ट्रसंघाच्या उपयुक्ततेबाबत आणि महत्त्वाबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेसह अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आपला प्रभाव गमावत असल्याचे चित्र आहे. रायसीना डायलॉगमध्ये सहभागी झालेल्या तज्ज्ञांमध्ये या संस्थांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत व्यापक सहमती दिसून आली.

गेल्या काही वर्षांत कोविड महामारी, रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील हिंसक संघर्ष आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुनरागमनाने जागतिक परिस्थितीत मोठी उलथापालथ झाली आहे. रायसीना डायलॉगमध्ये या परिस्थितींचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी जागतिक पुरवठा साखळी अधिक लवचिक आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी सखोल चर्चा झाली. बदललेल्या परिस्थितीत जागतिक व्यापार अधिक सुलभ करण्यासाठी आणि त्यातील अनिश्चितता दूर करण्यासाठी विविध उपाय सुचविण्यात आले. नव्या आर्थिक विकासाच्या संकल्पना आणि त्या प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेनेही संवाद झाला. सध्या जग अस्थिरता आणि असुरक्षिततेच्या टप्प्यातून जात आहे. या पार्श्वभूमीवर शांततेसाठी विविध पर्याय सुचवण्यात आले. त्यामुळे, भारतीय उपक्रम असूनही, रायसीना डायलॉग हा जागतिक अजेंडाला दिशा देणारा महत्त्वाचा मंच ठरत असल्याचे स्पष्ट झाले. यंदा न्यूझीलंडचे पंतप्रधान या कार्यक्रमाचे विशेष अतिथी असल्यामुळे या मंचाच्या बाहेरही द्विपक्षीय संबंधांवर चर्चा होणे हे त्यांच्या भारत दौऱ्याचा एक महत्त्वाचा भाग होता. दोन्ही देशांनी परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले आणि परस्परहिताच्या मुद्द्यांवर सहकार्य वाढवण्याचा संकल्प व्यक्त केला.



गुरु माँ जी
9167528575

साप्ताहिक राशिभविष्य

### मेष

व्यवसायः तुमच्या वाणीच्या मदतीने तुम्ही इतरांकडून तुमची सर्व कामे करून घेऊ शकाल. विदेशाशी संबंधित काम करणाऱ्यांना अनपेक्षित लाभ मिळेल. करिअरमध्ये प्रगती आणि फायदा होईल. व्यवसायात नफा मिळण्याची शक्यता आहे आणि आर्थिक स्थिती मजबूत राहील, तरीही खर्च वाढलेले असतील. तुमच्या व्यवसायिक समजुतीत सुधारणा होईल, त्यामुळे तुम्ही उत्तम योजना आखून कामाचा विस्तार करू शकाल. नोकरी करणाऱ्यांना त्यांच्या जोश, विवेक आणि सर्जनशीलतेमुळे यश मिळू शकते. तुम्ही भागीदारीत कामे पुढे नेऊ शकता.
आरोग्यः आरोग्य सामान्य राहील.
प्रेमः जर तुम्ही कोणाला तुमचे प्रेम व्यक्त करू इच्छित असाल तर हे करण्याने तुमचे नाते दृढ होईल. वैवाहिक जीवनात प्रेम आणि सौहार्द राहील

### वृषभ

व्यवसायः बुद्धी आणि विवेकाचा योग्य वापर करून तुम्ही अपूर्ण कामे सहज पूर्ण करू शकाल. कोणताही निर्णय घेताना विचारपूर्वक घ्या. उत्पन्न वाढू शकते आणि कामाच्या निमित्ताने प्रवास होऊ शकतो. नोकरीत थोडे सतर्क राहण्याची गरज आहे. ज्या गोष्टी करण्याची इच्छा असेल, त्यात काही ना काही अडथळे येऊ शकतात. व्यवसायात नवे प्रयोग करण्याची योजना बनवाल. विदेशी भूमीवर नोकरी शोधत असाल तर यश मिळण्याची शक्यता आहे.
आरोग्यः उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी आपली दिनचर्या आणि आहार व्यवस्थित ठेवण्याचा प्रयत्न करावा.
प्रेमः वैवाहिक जीवनात जोडीदार आणि महिलांकडून तुम्हाला सहकार्य मिळेल.

### मिथुन

व्यवसायः बँकिंग आणि मीडिया क्षेत्रातील लोकांसाठी हा आठवडा विशेषतः शुभ ठरेल. संपर्कांचा योग्य वापर कराल. व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिकांसाठीही हा काळ चांगला जाईल. विदेश प्रवासात थोड्या अडचणी येऊ शकतात. इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका. आधुनिक ट्रेंडनुसार तुम्ही पुढे जाल. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये तुमची रुची वाढेल आणि त्यात तुम्ही उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रयत्नशील राहाल. कोर्ट-कचेरीपासून दूर राहा. आर्थिक स्थिती मधल्या काळात मजबूत होईल. शुभ बातमी मिळेल. नोकरी करणाऱ्या व्यक्तींना त्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यास यश मिळेल.
आरोग्यः आरोग्य उत्तम राहील. महिलांना त्वचेच्या संसर्गाची समस्या होऊ शकते.
प्रेमः वैवाहिक जीवन सुखमय राहील.

### कर्क

व्यवसायः तुमच्या करिअरमध्ये तुम्हाला फायदे मिळू शकतात. नोकरीत प्रमोशन किंवा नवीन संधी मिळू शकतात, तसेच दीर्घकालीन योजनांचा पुनर्विचार करा. तुमच्या विश्वासांना आणि संधींना विस्तार द्या. व्यवसायात वेग वाढेल. मधल्या काळात व्यावसायिक यश मिळेल, आणि शेवटी आर्थिक स्थिती मजबूत होईल. आर्थिक किंवा व्यावसायिक दृष्टिकोनातून, एका नात्याला सुधारताना दुसरे नाते धोक्यात येऊ शकते. नोकरीत मान-सन्मान आणि प्रतिष्ठा मिळेल. मीडिया, क्रीडा आणि व्यवस्थापन क्षेत्रातील लोकांना मेहनतीचे पूर्ण फळ मिळेल.
आरोग्यः आरोग्य थोडे बिघडू शकते. चढ-उतार राहतील.
प्रेमः प्रेमजीवन चांगले राहील. नवीन नाते जुळू शकते, तसेच प्रियकर/प्रेयसीसोबत प्रवासाचे योग आहेत.

### सिंह

व्यवसायः कोणत्याही अवैध कामांपासून दूर राहा, अन्यथा अडचणीत येऊ शकता. आर्थिक स्थिती संतुलित राहील, पण अनावश्यक खर्च टाळा. हा कालावधी संमिश्र असेल, जिथे सूर्याची मजबूत स्थिती तुमच्या योजना विस्तारण्यास मदत करू शकते. तुम्ही सक्रिय राहाल, त्यामुळे प्रमोशन किंवा चांगल्या पदावर काम करण्याची संधी मिळू शकते. व्यवसायाच्या दृष्टीनेही हा आठवडा संमिश्र असेल. विचारपूर्वक भांडवल गुंतवल्यास मोठ्या नफ्याची शक्यता आहे.
आरोग्यः थकवा आणि चिडचिडेपणा जाणवेल. बद्धकोष्ठता आणि वायू विकार होण्याची शक्यता आहे.
प्रेमः नातेसंबंध अधिक घट्ट होतील, पण अहंकाराच्या टकरावापासून सावध रहा.

### कन्या

व्यवसायः वेळ अनुकूल असेल. तुमचे महत्त्व वाढेल. मोठ्या योजनांचा विस्तार करण्यास यश मिळू शकते. राहू आणि केतूमुळे काही अडथळे येऊ शकतात, पण तुमच्या मेहनतीने परिस्थिती तुमच्या बाजूने करता येईल. या आठवड्यात काही मोठे आणि महत्त्वाचे काम पूर्ण होतील. सक्रिय राहिल्यास लोकप्रसिद्धी मिळू शकते. व्यवसाय समजून घेत भांडवल गुंतवल्यास परिस्थितीत लक्षणीय सुधारणा होऊ शकते. काही महत्त्वाची वस्तू किंवा दस्तऐवज मिळू शकतो, ज्याला सुरक्षित ठेवणे आवश्यक असेल. व्यवसायात गांभीर्याने आणि ठोस निर्णय घ्यावे लागतील.
आरोग्यः आरोग्याच्या बाबतीत सावध राहा. रक्तदाबाची समस्या होऊ शकते.
प्रेमः प्रेमसंबंध रोमँटिक आणि उत्साही राहतील. जोडीदाराचे पूर्ण सहकार्य मिळेल.

### तूळ

व्यवसायः प्रतिस्पर्धक आणि शत्रूं पासून सावध राहा. आठवड्याच्या मध्यात शक्यतो नवीन काम सुरू करू नका. कामाच्या ओझ्यामुळे मानसिक अस्वस्थता जाणवेल. वेळेत काम पूर्ण न झाल्यास चिंतेत राहाल. तरीही, शेवटच्या टप्प्यात पुन्हा तुमच्या मूळ लयीत परत याल. नोकरीची स्थिती चांगली राहील, परंतु शेवट काहीसा कठीण जाऊ शकतो. कोणताही धोका घेऊ नका. सुरुवातीला शत्रू अडथळे निर्माण करू शकतात, पण ते नियंत्रित होतील. मध्य काळात आनंदी राहाल. नोकरी किंवा व्यवसायात कोणत्याही प्रकारचा धोका घेणे टाळा, कारण त्यामुळे नुकसान होऊ शकते. तुमच्या योजना यशस्वी होण्याची शक्यता आहे आणि उत्पन्न वाढू शकते.
आरोग्यः पायाला इजा होऊ शकते, त्यामुळे काळजी घ्या. दिनचर्या सुधारण्याची गरज आहे.
प्रेमः वैवाहिक सुख वाढेल, पण बोलताना संयम बाळगा. जोडीदाराच्या मनाला दुखावणारी गोष्ट मजेतही बोलू नका, अन्यथा नात्यात तणाव येऊ शकतो.

### वृश्चिक

व्यवसायः व्यवसायात थोड्या अडचणी येऊ शकतात, पण तुम्ही त्या सोडवू शकाल. उत्पन्न झपाट्याने वाढू शकते. नोकरीची स्थिती चांगली राहील आणि शुभ संकेत मिळतील. कमाई वाढवण्याच्या संधी मिळू शकतात. भागीदारीतील व्यावसायिकांना चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायाच्या दृष्टीने आठवडा थोडा आव्हानात्मक असेल, त्यामुळे गुंतवणूक करण्यापूर्वी नीट विचार करा. विरोधक आणि स्पर्धक सक्रिय राहतील, त्यामुळे काही अडथळे येऊ शकतात.
आरोग्यः वाहन चालवताना काळजी घ्या. सर्दी, ताप यांसारख्या त्रासांचा सामना करावा लागू शकतो.
प्रेमः वैवाहिक जीवन चांगले जाईल. प्रेमसंबंधांमध्ये स्पष्टता ठेवा.

### धनू

व्यवसायः वेळ अनुकूल राहील, तरीही आर्थिक आव्हाने कायम राहू शकतात. पण कोणत्या ना कोणत्या प्रकारे परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यास यश मिळेल. मोठ्या आणि महत्त्वाच्या योजनांच्या विस्तारात यश मिळू शकते. थकबाकीची परतफेड करण्यास थोडेसे यश मिळेल. व्यवसायिकांसाठी हा कालावधी कठीण राहू शकतो, परंतु व्यवसाय योग्य मार्गावर राहील. नोकरी करणाऱ्यांना बदलीचा सामना करावा लागू शकतो. तुमच्या बजेटवर आणि खर्च करण्याच्या सवयींवर बारकाईने लक्ष ठेवा. हा अतिरिक्त उत्पन्न किंवा नवीन गुंतवणुकीच्या संधी शोधण्यासाठी अनुकूल काळ आहे.
आरोग्यः तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. तणाव टाळा.
प्रेमः हा आठवडा रोमँटिक भेटीगाठींसाठी अनुकूल आहे. तुमच्या प्रेमाची आणि प्रशंसेची व्यक्तीकरण करण्यासाठी वेळ द्या.

### मकर

व्यवसायः दीर्घकालीन उद्दिष्टांवर विचार करा आणि गरज वाटल्यास योग्य बदल करा. हा आठवडा अनपेक्षित खर्च घेऊन येऊ शकतो, त्यामुळे एक सुरक्षित आर्थिक योजना तयार करा. तुम्ही तुमचे काम पूर्ण करण्यात यशस्वी राहाल, पण अनावश्यक खर्च टाळा, अन्यथा कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते. व्यवसायात अनेक चढ-उतार असतील. जमीन, घर किंवा वाहन खरेदी होण्याची शक्यता आहे. नवीन काम सुरू करण्यासाठी योग्य वेळ आहे, विशेषतः जमीन आणि मालमत्तेशी संबंधित प्रकरणांमध्ये यश मिळण्याची शक्यता जास्त आहे. कार्यक्षेत्रात एखादे सरप्राईज गिफ्ट मिळू शकते.
आरोग्यः आरोग्यावर लक्ष द्या. नाक, कान आणि घशाशी संबंधित त्रास होऊ शकतो.
प्रेमः वैवाहिक जीवन आनंददायी राहील. तुम्हाला चांगल्या ठिकाणी प्रवेश मिळण्याची शुभ बातमी मिळू शकते.

### कुंभ

व्यवसायः तुम्हाला अधिक धावपळ करावी लागू शकते, ज्यामुळे संघर्ष थोडा वाढू शकतो. मात्र, तुम्ही या अडचणींवर मात करण्यात यशस्वी राहाल. व्यवसायाच्या दृष्टीने हा आठवडा अनुकूल आहे. बाजार आणि शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. उत्पन्न वाढू शकते. प्रतिष्ठित लोकांशी भेट होण्याची संधी मिळेल. ठरवलेल्या कामांमध्ये यश मिळेल आणि अचानक धनलाभ होऊ शकतो. नोकरी किंवा व्यवसायात चांगले परिणाम मिळतील. गुंतवणुकीपासून दूर राहा. जिभेवर नियंत्रण ठेवा. जुगार, सट्टा किंवा लॉटरीमध्ये पैसे लावू नका. आठवड्याच्या शेवटी व्यावसायिक यश मिळेल आणि भौतिक संपत्ती वाढेल. तुमच्या आयुष्यातील समस्यांचा शेवट होण्याची शक्यता आहे. नोकरी करणाऱ्यांसाठी बॉस खुश राहू शकतो.
आरोग्यः मुखरोग होऊ शकतो, त्यामुळे काळजी घ्या.
प्रेमः प्रेम, भावना आणि एखाद्या खास व्यक्तीविषयी आकर्षण जाणवेल.

### मीन

व्यवसायः कामातील अडथळे दूर होतील. व्यावसायिक यश मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत नवीन संधी मिळू शकते, पण निर्णय विचारपूर्वक घ्या. महत्त्वाची कामे अडून राहणार नाहीत, याची काळजी घ्या. सरकारी नोकरी करणाऱ्यांसाठी अनुकूल काळ आहे. बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रमोशन मिळू शकते किंवा चांगल्या पदावर काम करण्याची संधी मिळू शकते. राजकारणात कार्यरत असलेल्या लोकांसाठीही वेळ अनुकूल आहे. लोकप्रियता वाढू शकते आणि एखाद्या मोठ्या पक्षाकडून तिकीट मिळण्याची शक्यता आहे. या आठवड्यात तुमचे महत्त्व वाढेल आणि त्यामुळे सक्रियता वाढेल. शेअर मार्केटमध्ये विचारपूर्वक गुंतवणूक केल्यास मोठा फायदा होऊ शकतो.
आरोग्यः काही अनपेक्षित घटना घडू शकतात, त्यामुळे आरोग्याची काळजी घ्या. चिडचिड होऊ शकते आणि डोळ्यांत त्रास जाणवू शकतो.
प्रेमः जीवनसाथीशी मतभेद होऊ शकतात.

# Script sacrosanct for Aaditi



**Mumbai:** Actress Aaditi Pohankar believes in maintaining the sanctity of the script. The actress, who shot to fame with her character in the hit streaming show *Aashram*, has said that the improvises only on the emotions of her character should a need arise.

The actress spoke with this agency about her process of approaching a part, and sticking by the script. She said that she doesn't even change the words in her lines. The reason behind the same is that her own sister is a writer so, the actress has the sense of what goes on a writers' minds when they write a dialogue, and how they intend the actor to speak those lines.

The actress said, "Everything is there in the script. I, in fact, don't even move words from the scene. If I am told that I have to improvise, then I improvise with emotion. I never improvise with lines. Because my sister is a writer, I have seen her. So if something is written, it is written for a reason. So, script is sacrosanct for me." IANS

# Sara's desire



**Mumbai: Sara Ali Khan has carved a niche for herself in the industry, taking on diverse roles that reflect contemporary narratives. As she continues her journey in Bollywood, she recently shared insights into the kind of films she would like to produce if given the opportunity. Her passion for storytelling and deep understanding of modern audiences highlight her evolving career.**

**Expressing her vision, Sara emphasised her desire to tell stories that resonate with modern Indian women. "Our country has so many stories. There was a time when I wanted to be a queen in a Sanjay Leela Bhansali film and a modern girl in a Zoya Akhtar film—both are still true. I just want to depict stories of a modern Indian girl with dreams, aspirations, and everything," she stated. Her commitment to portraying nuanced female characters aligns with the increasing demand for stories reflecting the aspirations and struggles of today's generation. With more actresses stepping into production, her potential entry into this space could strengthen the representation of independent, strong-willed women in Indian cinema.**

**On the acting front, Sara has an exciting lineup ahead. She will star alongside Aditya Roy Kapur in Anurag Basu's *Metro... In Dino,* exploring human relationships in a metropolitan setting.** IANS

# Palak's run-in with paparazzi



**Mumbai:** Actor Palak Tiwari recently found herself at the receiving end of a frustrating encounter with the paparazzi. As she was being clicked, one of the photographers referred to her as Ananya Panday, leaving Palak visibly irked.

Palak Tiwari was recently spotted at the airport in Mumbai when her encounter with the paparazzi left her disheartened. As she arrived, smiling and waving at the photographers, one of them posed a question that caught her off guard: "*Palak Tiwari bole ya Ananya Panday bole*? (Should we call you Palak Tiwari or Ananya Panday?)"

Initially, Palak chose to ignore the remark, but when the photographers repeated the question, she couldn't help but respond. With a hint of frustration, she asked, "*Hamesha aise kyu bolte ho aap log*?" (Why do you always speak like this?)". She then walked away.

Despite the moment, she maintained her composure. For the airport outing, she was dressed in a black one-shoulder top featuring a *Bhootnii* poster and grey denim.

The video of the same has surfaced on social media, following which social media users dropped shocking face emojis in the comment section. IANS

# Randeep's childhood inspiration



**Mumbai:** Randeep Hooda is set to share screen space with veteran actor Sunny Deol in the upcoming action film *Jaat*, directed by Gopichand Malineni. The film promises high-intensity action sequences and has generated significant buzz, especially after the release of its trailer.

Hooda, known for his compelling performances, is receiving praise for his powerful presence alongside Deol. For him, *Jaat* is more than just another film—it is a personal milestone. Reflecting on his admiration for Deol, Hooda revealed that he and his friends idolised the actor during their school days, even keeping his posters in their hostel cupboards for inspiration. "I have always been a huge fan of Sunny Deol. Growing up, we admired his powerful screen presence, intensity, and physique. I remember having his posters in our school hostel cupboards, looking at them and getting inspired to lift weights and do push-ups," he shared.

Discussing his role, Hooda expressed excitement about matching Deol's energy on screen. "Playing an ultra-macho action star opposite a legend like Sunny sir is a dream. He is a powerhouse, and sharing space with him is both a challenge and an honor," he added.

With *Jaat* marking Malineni's Bollywood debut, the film promises an action-packed showdown. Set for release April 10, 2025, it features an ensemble cast, including Regina Cassandra, Saiyami Kher, and Vineet Kumar Singh. AGENCIES

## WEEK'S BEST PICS


A person wearing a Pikachu costume joined numerous demonstrators in Istanbul, protesting against the detention of Mayor Ekrem Imamoglu, who is a significant opponent of President Recep Tayyip Erdogan.


A combo of 3 images taken from a viral social media video shows the moments as a building collapses during an earthquake, in Bangkok, Thailand.

**24 घंटों में आए भूकंप के 15 झटके**

# मरने वालों की संख्या 1000 पार, 2000 से अधिक घायल, दहशत में लोग
# पीएम मोदी ने वरिष्ठ जनरल से की बात, भारत का ऑपरेशन 'ब्रह्मा' शुरू

एजेंसी ▶▶ नई दिल्ली

म्यांमार में 24 घंटे में ही भूकंप के आए 16 तेज झटकों से लोग दहशत में हैं। नेशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी के मुताबिक शनिवार दोपहर करीब 2:50 बजे भूकंप का 16वां झटका लगा। रिक्टर पैमाने पर भूकंप की तीव्रता 4.7 मापी गई। पीएम नरेंद्र मोदी ने शनिवार को म्यांमार के वरिष्ठ जनरल मिन आंग ह्लाइंग से बात की। उन्होंने कहा कि एक करीबी मित्र और पड़ोसी के रूप में भारत इस मुश्किल घड़ी में म्यांमार के लोगों के साथ एकजुटता से खड़ा है। भारत ने ऑपरेशन ब्रह्मा के तहत राहत सामग्री भेजी है। वायुसेना का विमान सी-130 जे करीब 15 टन राहत सामग्री लेकर यांगून पहुंच गया है। राहत पैकेज में टेंट, स्लीपिंग बैग, कंबल, भोजन के पैकेट, वाटर प्यूरीफायर, हाइजीन किट, सोलर लैंप, जनरेटर सेट और पैरासिटामोल, एंटीबायोटिक्स, सीरिंज, दस्ताने और पट्टियां जैसी आवश्यक जीचें शामिल हैं। प्रभावित इलाकों में मदद और राहत-बचाव कार्य के लिए भारत से राष्ट्रीय आपदा मोचन बल (एनडीआरएफ) की टीम को भेजा गया है।

भूकंप का 16वां झटका 4.7 तीव्रता का रहा

थाईलैंड में करीब 10 लोगों की भूकंप से मौत

भारत ने सी-130जे से भेजी 15 टन राहत



## हर तरफ मलबा और टूटी इमारतें

म्यांमार की सेना (जुंटा) के हवाले से बताया है कि भूकंप में अबतक 694 लोगों की मौत हुई है, जबकि 1,670 घायल हुए हैं। वहीं अमेरिकी भूवैज्ञानिक सर्वेक्षण (यूएसजीएस) का अनुमान है कि मरने वालों की संख्या 1,000 से अधिक हो सकती है। अस्पतालों में खून की भारी किल्लत की खबरें मिल रही हैं। म्यांमार में राहत और बचाव कार्य तेजी से जारी हैं, लेकिन हर तरफ मलबे का ढेर, टूटी सड़कें, और ढही इमारतें नजर आ रही है। बताया जा रहा है कि, अस्पतालों में घायलों की तादाद भी हजारों में है। म्यांमार के अनुसार, पांच शहरों और कई कस्बों में इमारतें गिर गई हैं और दो प्रमुख पुल भी ढह चुके हैं।






## पीएम मोदी ने कहा- मुश्किल वक्त में भारत खड़ा है साथ

पीएम मोदी सोशल मीडिया हैंडल एक्स पर एक पोस्ट में कहा कि म्यांमार के वरिष्ठ जनरल महामहिम मिन आंग ह्लाइंग से बात की। विनाशकारी भूकंप में हुई मौतों पर अपनी गहरी संवेदना व्यक्त की। एक करीबी दोस्त और पड़ोसी के रूप में, भारत इस मुश्किल घड़ी में म्यांमार के लोगों के साथ एकजुटता से खड़ा है। ऑपरेशन ब्रह्मा के तहत आपदा राहत सामग्री, मानवीय सहायता, खोज और बचाव दल को प्रभावित क्षेत्रों में तेजी से भेजा जा रहा है।

## इन शहरों में भारी नुकसान



## मस्क ने बढ़ाया मदद का हाथ स्टारलिंक किट की पेशकश की

एक्स के मालिक एलन मस्क ने भी मदद की पेशकश की है। मस्क ने सोशल मीडिया प्लेटफॉर्म एक्स पर कहा कि थाईलैंड और म्यांमार में भूकंप के कारण हुए नुकसान के बारे में सुनकर बहुत दुख हुआ। स्पेसएक्स की टीम संचार आवश्यकताओं और राहत प्रयासों में सहायता के लिए स्टारलिंक किट प्रदान करने के लिए तैयार है। स्टारलिंक एक सैटेलाइट कॉन्सटेबुल सिस्टम है जिसका उद्देश्य वैश्विक इंटरनेट कवरेज देना है। यह सिस्टम ग्रामीण और भौगोलिक रूप से अलग-थलग क्षेत्रों के लिए आदर्श है जहां इंटरनेट कनेक्टिविटी न के बराबर होती है।







OWNER, PRINTER & PUBLISHER **MR. SANDEEP VITTHAL KASALKAR**. Printed at **Somani Printing Press**, Unit No. 4, Ground Floor, N. K. Industrial Estate, Off Aarey Road, Near Parvasi Ind. Estate, Gate No. 2, Goregaon (E), Mumbai – 400063. Published at 5/40, M.H.B. Colony, Sarvodaya Nagar, Opp. Hema Industrial Estate, Jogeshwari East, Mumbai 400060.

**Editor – MR. SANDEEP VITTHAL KASALKAR** **MOB: 90299 09904** **RNI No.: MAHMUL/2021/81645**